महाराष्ट्र राज्यातील १३ मासळी उतरविण्याच्या केंद्रातील (FLC) गाळ काढण्याच्या (Dredging) कामांसाठी एकूण रु.३९८२.०३ लक्ष इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत.

महाराष्ट्र शासन

पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

शासन निर्णय- मत्स्यवि-११२६/प्र.क्र.१९६/पदुम-१४ (E-१६६५७४२)

मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२

दिनांक - १७ जुलै, २०२६.

वाचा-

१) भारत सरकार, पदुम मंत्रालय, मत्स्यव्यवसाय विभाग यांचे पत्र क्र. जे.२४००१/३२/२०२६-एफवाय, दि.३१.०३.२०२६ रोजीचे पत्र.

२) आयुक्त मत्स्यव्यवसाय कार्यालयाचे क्र.Fish/Engg/१८०१०१/६२५/२०२३-२४, दि.२४.०३.२०२६ रोजीचे पत्र.

३) आयुक्त मत्स्यव्यवसाय कार्यालयाचे क्र. मत्स्य/अभि/१८०१०१/६२५/२०२३-२४/२८, दि.१२.०५.२०२६ रोजीचे पत्र.

४) आयुक्त मत्स्यव्यवसाय कार्यालयाचे क्र. मत्स्य/निपास/०३१७०१/३६२/२०२६, दि.२२.०५.२०२६ रोजीचे पत्र.

प्रस्तावना -

महाराष्ट्र शासनाचे दि.२४.०३.२०२६ रोजीचे पत्र तसेच, प्रकल्प मुल्यांकन समिती (PAC), राष्ट्रीय मत्स्य विकास मंडळ (NFDB) यांनी दि.२७.०३.२०२६ ची शिफारस विचारात घेऊन, केंद्र शासनाने वाचा-१ येथील दि.३१.०३.२०२६ रोजीच्या पत्रान्वये, महाराष्ट्र राज्यातील १३ मासळी उतरविण्याच्या केंद्रातील (FLC) गाळ काढण्याच्या (Dredging) प्रस्तावास सक्षम प्राधिका-यांनी मान्यता दिली असून, सदर कामाचा एकूण अंदाजित खर्च रु.३९८२.०३ लक्ष (केंद्र हिस्सा रु.२३८९.२१ लक्ष व राज्य हिस्सा रु.२३८९.२१ लक्ष) इतका मंजूर केला आहे.

२. विषयांकीत प्रकल्प हा प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजना (PMMSY) अंतर्गत सन २०२५-२६ या आर्थिक वर्षातील राज्याच्या वार्षिक कृती आराखडा (AAP) अंतर्गत, पूर्वी मंजूर व समर्पित (Surrendered) उपक्रमांच्या अनुषंगाने राबविण्यात येणार आहे. या प्रकल्पाचा मुख्य उद्देश मासेमारी नौकांच्या सुरक्षित व कार्यक्षम हालचालीस सुलभता निर्माण करणे, हा आहे. केंद्र शासनाने दि.२२.०४.२०२४ रोजीच्या अधिसूचनेनुसार, प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजना (PMMSY) या योजनेच्या अंमलबजावणीसाठी प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली असून, सदर योजनेंतर्गत मत्स्यव्यवसाय क्षेत्राचा शाश्वत व जबाबदार विकास साधून ब्लू रेव्होल्यूशन साध्य करण्याच्या उद्देशाने राबविण्यात येत आहे.

३.	आयुक्त (मत्स्यव्यवसाय) कार्यालयाने वाचा-३ येथील दि.१२.०५.२०२६ रोजीच्या पत्रान्वये विनंती केल्यानुसार, राज्यातील १३ मासळी उतरविण्याच्या केंद्रातील (FLC) गाळ काढण्याच्या (Dredging) कामांसाठी केंद्र हिस्सा रु.२३८९.२२ लाख (अक्षरी रुपये तेवीस कोटी एकोन्नवद लाख बावीस हजार फक्त) व राज्य हिस्सा रु.१५९२.८१ लाख (अक्षरी रुपये पंधरा कोटी ब्यान्नव लाख एक्याऐंशी हजार फक्त) असा एकूण रु.३९८२.०३ लाख (अक्षरी रुपये एकोणचाळीस कोटी ब्याऐंशी लाख तीन हजार फक्त) इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय :-</u>

महाराष्ट्र राज्यातील खालील तक्त्यामध्ये नमूद १३ मासळी उतरविण्याच्या केंद्रातील (FLC) गाळ काढण्याच्या (Dredging) कामांसाठी केंद्र हिस्सा रु.२३८९.२२ लाख (अक्षरी रुपये तेवीस कोटी एकोन्नवद लाख बावीस हजार फक्त) व राज्य हिस्सा रु.१५९२.८१ लाख (अक्षरी रुपये पंधरा कोटी ब्यान्नव लाख एक्याऐंशी हजार फक्त) असा एकूण रु.३९८२.०३ लाख (अक्षरी रुपये एकोणचाळीस कोटी ब्याऐंशी लाख तीन हजार फक्त) इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

(आकडे रुपयेमध्ये)

अ क्र	प्रकल्पाचे नाव	मंजूर अंदाजपत्रकीय प्रकल्प किंमत	केंद्र हिस्सा	राज्य हिस्सा
१	दातिवरे, जि.पालघर	३,१०,७०,६३३.००	१,८६,४२,३७९.८०	१,२४,२८,२५३.२०
२	वसई खाडी, जि.पालघर	२,७८,०६,९३३.००	१,६६,८४,१५९.८०	१,११,२२,७७३.२०
३	धारावी (उत्तन डोंगरी), जि.ठाणे	२,७९,५६,०२५.००	१,६७,७३,६१५.००	१,११,८२,४१०.००
४	वाशी खाडी दिवाळे जेट्टी, जि.ठाणे	१,३४,१७,८५७.००	८०,५०,७१४.२०	५३,६७,१४२.८०
५	आडेउतंबर, जि.रत्नागिरी	४,९१,२१,२२४.००	२,९४,७२,७३४.४०	१,९६,४८,४८९.६०
६	दाभोळ, जि.रत्नागिरी	१,२७,३९,९८३.००	७६,४३,९८९.८०	५०,९५,९९३.२०
७	मि-याबंदर, जि.रत्नागिरी	२,७०,९७,२२७.००	१,६२,५८,३३६.२०	१,०८,३८,८९०.८०
८	कालबादेवी, जि.रत्नागिरी	२,२४,२०,१७३.००	१,३४,५२,१०३.८०	८९,६८,०६९.२०
९	राजीवाडा, जि.रत्नागिरी	२,६६,६३,८८८.००	१,५९,९८,३३२.८०	१,०६,६५,५५५.२०
१०	आचरा खाडी, जि.सिंधुदुर्ग	१,६१,३८,५०३.००	९६,८३,१०१.८०	६४,५५,४०१.२०
११	तारामुंब्री, जि.सिंधुदुर्ग	४,८१,३७,४८२.००	२,८८,८२,४८९.२०	१,९२,५४,९९२.८०
१२	अग्लेचीवाडी, जि.रायगड	४,८२,४६,६२५.००	२,८९,४७,९७५.००	१,९२,९८,६५०.००
१३	थेरोंदा, जि.रायगड	४,७३,८६,५७०.००	२,८४,३१,९४२.००	१,८९,५४,६२८.००
	एकूण	**३९,८२,०३,१२३.००**	**२३,८९,२१,८७३.८०**	**१५,९२,८१,२४९.२०**

२.	वर नमूद १३ मासळी उतरविण्याच्या केंद्रातील (FLC) गाळ काढण्याच्या (Dredging) कामांसाठी खालील अटी व शर्ती लागू असतीलः-

२.१ केंद्र शासनाने दि.३१.०३.२०२६ रोजीच्या पत्रान्वये, १३ मासळी उतरविण्याच्या केंद्रातील (FLC) गाळ काढण्याच्या (Dredging) प्रशासकीय मान्यता देताना, नमूद केलेल्या अटी व शर्तींचे काटेकोर पालन करण्यात यावे.

२.२ मासळी उतरविण्याच्या केंद्रातील (FLC) गाळ काढण्यासंदर्भातील सर्व १३ प्रकल्पांच्या कामांचे Third Party Verification करण्यात यावे.

२.३ सदर १३ मासळी उतरविण्याच्या केंद्रातील (FLC) गाळ काढणे (Dredging) प्रकल्पांच्या तांत्रिक मान्यता घेणे, पर्यावरणीय विषयक (CRZ) व अन्य पूर्व मान्यता व ना-हरकत प्रमाणपत्र घेणे तसेच, ही सर्व कामे दर्जेदार व विहित वेळेत पूर्ण करणे, याबाबतची सर्व जबाबदारी महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळाची राहील.

२.४ प्रस्तूत १३ केंद्रांचे गाळ काढणेबाबत निश्चित केलेली कामे ही १२ महिन्यात पूर्ण करण्याची महामंडळाने दक्षता घ्यावी. यासाठी आवश्यक पर्यवेक्षण व संनियत्रण प्रभावीपणे करण्यात यावे.

२.५ मासळी उतरविण्याच्या केंद्रातील महसूल स्त्रोताबाबत केंद्र शासनाने नमूद केलेल्या अट क्र. (xviii) नुसार, आवश्यक कार्यवाही करावी. यानुषंगाने सदर केंद्राची देखभाल दुरुस्ती व अन्य खर्च हा उक्त महसुलामधून भागविण्यात यावा.

२.६ आयुक्त, मत्स्यव्यवसाय, मुंबई यांनी सदर कामासंदर्भात कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळ, मुंबई यांचेसोबत दर तिमाही बैठक घेऊन कामाचा आढावा घ्याव व शासनास वेळच्या वेळी प्रगती अहवाल सादर करावा.

२.७ १३ मासळी उतरविण्याच्या केंद्रातील (FLC) गाळ काढण्याच्या (Dredging) कामांसाठी येणारा खर्च हा खाली नमूद लेखाशिर्षाखाली भागविण्यात यावाः-

(अ) मागणी क्र.डी-०९,
४४०५- मत्स्यव्यवसायावरील भांडवली खर्च,
१०३ सागरी मत्स्यव्यवसाय,
०२-प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजना (केंद्र पुरस्कृत योजना)
(०२)(०२) प्रधानमंत्री मत्स्यसंपदा लाभार्थी हिस्सा नसलेल्या योजना
(केंद्र हिस्सा ६० टक्के) **(४४०५ ३४७२)** ३३-अर्थसहाय्य

(ब) मागणी क्र.डी-०९,
४४०५- मत्स्यव्यवसायावरील भांडवली खर्च,
१०३ सागरी मत्स्यव्यवसाय,
०२-प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजना (केंद्र पुरस्कृत योजना)
(०२)(०३) प्रधानमंत्री मत्स्यसंपदा लाभार्थी हिस्सा नसलेल्या योजना
(राज्य हिस्सा ४० टक्के) **(४४०५ ३४८१)** ३३-अर्थसहाय्य

३.	हा शासन निर्णय नियोजन विभागाचे अनौ.संदर्भ क्र.१३९/का.१४३१, दि.२७.०५.२०२६ तसेच, वित्त विभागाचे ई.ऑफिस क्र.१६६५७४२/टिप्पणी क्र.३०, दि.१८.०६.२०२६ अन्वये दिलेल्या मान्यतेस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०७१७१४१४०१८८४५ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

JAKHATE KISHOR MAHADEO

Digitally signed by JAKHATE KISHOR MAHADEO
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Fisheries Department, 2.5.4.20=83112E1445917D0A21FBAB36D7C0FF41E09863C93A2E62EA1B0C01DA16B7A161, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=032A6ACBFD529D66DD76E26EAB14B28C6DD07D2F776E529B44BA2CB45324C503, cn=JAKHATE KISHOR MAHADEO
Date: 2026.07.17 14:15:06 +05'30'

(किशोर जकाते)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
२) मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
३) सचिव (पदुम), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
४) सचिव (बंदरे), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
५) सचिव (बांधकामे), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
६) आयुक्त, मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
७) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळ, मुंबई
८) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, मुंबई
९) सह आयुक्त (सागरी/निमखार/भूजल), आयुक्त मत्स्यव्यवसाय यांचे कार्यालय, मुंबई
१०) प्रादेशिक उपायुक्त, मत्स्यव्यवसाय, मुंबई
११) उपसंचालक (सागरी), आयुक्त, मत्स्यव्यवसाय यांचे कार्यालय, मुंबई
१२) सहाय्यक आयुक्त, मत्स्यव्यवसाय, रत्नागिरी
१३) महालेखापाल, महाराष्ट्र राज्य-१/२ (लेखा परिक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई
१४) वित्त विभाग (व्यय-१/ अर्थसंकल्प-१५), मंत्रालय, मुंबई
१५) नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
१६) कक्ष अधिकारी (पदुम-१६), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
१७) निवडनस्ती (पदुम-१४)